**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**अतितात्काळ**

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

लोकशाही निवडणूक व सुशासन तसेच मतदार साक्षरतेबाबतचे मा.अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई यांचे क्रमांक - रानिआ-२०१७/प्र.क्र.८/प्रकल्प, दि.२१/०५/२०१८ चे पत्र, मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.उशिसं/निवडणूक/परिपत्रक/मवि-१/२०१८/५८९९, दिनांक २४ मे, २०१८ चे पत्र व सदर पत्रासोबतचे मा. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक. : संकीर्ण- १११९/(प्र.क्र.११९/१६) समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या महाविद्यालयामार्फत किती नवीन मतदार नोंदणी झाली याची माहिती आपण डॉ.प्रल्हाद माने, नोडल ऑफिसर, शिवाजी विद्यापीठ यांना manesuk@gmail.com या ई-मेलवर तात्काळ पाठवावी. त्याचप्रमाणे, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये होणा-या नवीन मतदान नोंदणीची माहिती मार्च/एप्रिल, २०१९ पर्यंत उपरोक्त नमुद मेलवर पाठविण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/No 70 = - -
दि. 27 JUN 2018

Shivaji University, Kolhapur
Affiliation T-2
Inward No. 6263
Date 29/05/2018

"लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर विद्यापीठांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत...
व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मा. कुलगुरु यांची बैठक
दिनांक ०५/०६/२०१८ सकाळी ११.०० वा.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ -२०१७/प्र.क्र. ८/प्रकल्प,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :२१/०५/२०१८.

प्रति,

मा. कुलगुरु,

१. मुंबई विद्यापीठ, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई
२. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर
७. संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती
८. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
९. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
१०. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
११. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 25 MAY 2018
Inward No. 1015
To Whom PVC

Shivaji University, Kolhapur
Pro-Vice-Chancellor Office
Date :- 28 MAY 2018
Inward No.:- 4894
To Whom :- (1) BOS (2) Affi. T2

विषय :- "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर विद्यापीठांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत...
व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मा. कुलगुरु यांची बैठक
दिनांक ०५/०६/२०१८, वेळ- सकाळी ११.०० वाजता

महोदय,

आपल्याला माहितच असेल की, देशामध्ये लोकशाही सुदृढ करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे राज्य शासन व राज्यातील अनेक विद्यापीठांनी गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक नवीन पावले उचलली आहेत. उदा. -

(i) विद्यापीठामध्ये प्रवेश घेताना १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंदणी करण्याकरिता प्रवेश अर्जामध्ये दुरुस्ती करणे.

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६८३/१६/विशि-३, दिनांक-१५ मे, २०१७, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३५/१७/शिक्षण-१, दिनांक -२ जून, २०१७ व कृषी व पदुम विभाग क्रमांक-मपवि-२०१७/प्र.क्र.३७/माफसु, दिनांक ५ मे, २०१७)

(ii) विद्यापीठामध्ये प्रथम वर्गामध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना Foundation Course मध्ये "लोकशाही, निवडणुका (प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या) व सुशासन" याबाबतचे Module परिचय अनिवार्य करणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडीत अत्यंत कमी प्रमाणात संशोधन झाले असल्याने त्याबाबत स्वत:च्या निधीमधून संशोधन प्रकल्प (Research Project) राबविणे.

(iv) विद्यापीठांमध्ये "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयाचे नवीन कोर्स सुरु करणे. (दीर्घ व लघु मुदतीचे)

(v) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाच्या अनुभवासाठी १८ ते २० वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी आयोजित करणे.

(vi) "लोकशाही, निवडणुका व सुशासन" शी निगडीत विविध विषयांवर विद्यापीठांनी राज्य निवडणूक आयोगाच्या सल्ल्याने कार्यशाळा आयोजित करणे.

२. वरील विषयांबाबत मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी गेल्या एका वर्षामध्ये आपल्याशी व आपल्या अधिकाऱ्यांसमवेत अनेक बैठका घेऊन योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार काही विद्यापीठांनी पुढाकार घेतला असून, बहुतांशी विद्यापीठांनी अजूनही या विषयाकडे गांभीर्याने पाहिल्याचे दिसत नाही.

३. आपल्याला आठवत असेल की, मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी "लोकशाही पंधरवड्या"च्या सांगता समारोपाच्यावेळी सर्व विद्यापीठांचे कुलगुरु यांना वरील विषयांवर योग्य तो पुढाकार जलद गतीने घेण्याबाबत आवाहन केले होते. मला विश्वास आहे की, आपण त्याप्रमाणे कार्यवाहीस सुरुवात केली असेल.

४. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ काही दिवसानंतर सुरु होणार आहे. विद्यापीठ व त्यांच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांमध्ये नवीन मुले-मुली प्रवेश घेणार आहेत. ही बाब लक्षात घेता आपल्याला वर नमूद केलेल्या पाचही बाबींवर तातडीने लक्ष ठेवून सर्व प्रकारची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. वरील व इतर सर्व बाबींवर चर्चा करण्यासाठी मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी दिनांक ०५/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक आयोजित केली आहे. आपल्या विद्यापीठामध्ये व्हि.सी.ची व्यवस्था होणे शक्य नसल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत व्हि.सी. ची व्यवस्था करावी. सदर बैठकीस आपण स्वत:, कुलसचिव (Registrar), राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख (HOD of Political Science) यांच्यासह आवश्यक त्या सर्व माहितीसह व्यक्तिश: उपस्थित रहावे, ही विनंती.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत (विनंतीसह) :-

१. जिल्हाधिकारी, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, गडचिरोली (१०)

त्यांनी विद्यापीठांच्या कुलगुरुंशी संपर्क साधून शक्य असल्यास विद्यापीठांमधून नाहीतर आपल्या कार्यालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची व्यवस्था करावी व स्वत:देखील व्हि.सी. मध्ये उपस्थित रहावे.

२. श्री. भीम रासकर, RSCD
डॉ. मृदुल निळे, मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई
श्रीमती मानसी फडके, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे
यांनी सदर बैठकीस व्हि.सी. द्वारे अथवा प्रत्यक्ष हजर रहावे.

३. माहितीसाठी :-
(i) मा. राज्यपाल यांचे सचिव,
(ii) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
(iii) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) मंत्रालय, मुंबई
(iv) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
(v) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
(vi) निवड नस्ती (प्रकल्प कक्ष) राज्य निवडणूक आयोग, मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/निवडणूक/परिपत्रक/मवि-१/२०१८/ ५८९९ दिनांक- २३ मे, २०१८
24 MAY 2018

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य

**विषय: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार साक्षरता-शाळा,माहाविद्यालय व सामाजिक घटकांमध्ये निवडणूक साक्षरता वाढविण्याबाबत.**

**संदर्भ**: उच्च तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण- ११११ / (प्र.क्र.११९/१६) / समन्वय दि. १९ एप्रिल,२०१८.

संदर्भांकित शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

सदर शासन परिपत्रकातील निर्देशानूसार कार्यवाही करण्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील विद्यापीठे व महाविद्यालये, शासकीय कार्यालये व संस्था यांना आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
21 APR 2018
आवक क्रमांक:
शाखा:-

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात शाळा, महाविद्यालय व सामाजिक घटकांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२११८/(प्र.क्र.११९/१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १९ एप्रिल, २०१८.

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभागाचे अ.शा. पत्र क्र.इएलआर-२०१७/प्र.क्र.७१६/२७/३३, दि.५.१.२०१८

शासन परिपत्रक -

शाळा, महाविद्यालये व सामाजिक घटकांमध्ये निवडणूक साक्षरता वाढविण्याच्या हेतुने निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करण्याबाबत भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केले आहे. त्यानुषंगाने राज्यातील शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक घटकांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (ELC) स्थापन करण्याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर निवडणूक साक्षरता राज्य समिती गठन करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सामान्य नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेबाबत १) संभाव्य मतदार २) नवीन मतदार ३) निवडणूक पाठशाळा व ४) मतदार जागरुकता मंच या स्तरावर कार्यवाही करावयाची आहे. या प्रत्येक घटकांसाठी स्थापन करावयाच्या क्लबचे स्वरुप व संरचना पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे. :-

संभाव्य मतदार :- नववी ते बारावी पर्यंतच्या वर्गासाठी माध्यमिक व वरिष्ठ माध्यमिक शाळांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करावयाचे आहे. सदर गटांमध्ये इयत्ता नववी ते बारावीतील विद्यार्थी सदस्य असावेत. प्रत्येक विभागातून निवडून आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींद्वारा कार्यकारी समिती स्थापन करुन त्याद्वारे निवडणूक साक्षरता क्लब चालविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यात यावे. सदर निवडणूक साक्षरता क्लब चालविण्यासाठी निवडणूकीचा अनुभव असलेल्या शिक्षकांच्या सहभागाने शाळेकडून सदर उपक्रम राबविण्यात यावा.

नवीन मतदार :- निवडणूक सारक्षरतेअंतर्ग विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेबाबत प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी महाविद्यालय, विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये निवडणूक सारक्षरता क्लब स्थापन करण्यात यावे. निवडणूकीचा अनुभव असलेल्या शिक्षकांद्वारा मार्गदर्शन आणि सहभागी करुन घेण्यात यावे. निवडणूक सारक्षरता क्लबमध्ये विद्यार्थी सभासद असतील आणि प्रत्येक विभागातून निवडून आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींद्वारा कार्यकारी समिती स्थापन करुन त्याद्वारे निवडणूक सारक्षरता क्लब चालविण्यात येईल. निवडणूक साक्षरता क्लबचा संयोजक कॅम्पस प्रतिनिधी असेल व तो नोडल व्यक्ती यांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यास मदत करील. निवडणूक सारक्षरता क्लब चालविण्यासाठी प्राथम्याने राज्यशास्त्र विभागातील एक किंवा दोन शिक्षक नोडल अधिकारी आणि मार्गदर्शक म्हणून काम पाहतील.

श्रीम सुषा शिंदे
02/05/2018

श्री. शिणगारे
Shinde

निवडणूक पाठशाळा :- अनौपचारिक शिक्षण संस्थेचा भाग नसलेल्या सामाजिक घटकातील [illegible] मतदार केंद्रनिहाय निवडणूक साक्षरता गटाची स्थापना करण्यात यावेत. सदर गटांना मतदार केंद्राच्या [illegible] निवडणूक पाठशाळा म्हणून संबोधण्यात यावे. निवडणूक पाठशाळेचा नोडल अधिकारी म्हणून BLO ची नियुक्ती करण्यात यावी. निवडणूक पाठशाळेत सभासदांना प्रवेश देण्यासाठी शिक्षक. निपक्ष संस्था. पंचायत अधिकारी किंवा मतदार संघातील नगरपालिकेचे अधिकारी यांची मदत घेण्यात यावी.

मतदार जागरुकता मंच :- शासकीय विभाग. शासकीय संस्था. स्वायत्त. निमसरकारी आणि [illegible] आणि खाजगी क्षेत्रात मतदार जागरुकता मंच सुरु करण्यात यावी. सदर मंचाचे सभासदस्यत्व सर्व कर्मचारी घेऊ शकतील. निवडणुकीच्या कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात यावे. विभाग/संस्थेद्वारा एका व्यक्तीची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी. मतदार जागरुकता मंचासाठी संबंधित नोडल अधिकारी जिल्हा निवडणूक अधिकारी. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याशी समन्वय साधेल.

३. उपरोक्त विशद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये स्तरावर निवडणूक साक्षरता क्लब ( ELC ) स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा स्तरावर नेमलेल्या समितीकडून पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने या कार्यक्रमामध्ये सर्व शाळा, महाविद्यालयांनी क्रियाशील सहकार्य व सहभाग घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रा. वि. जाधव )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्ष नेता ( विधानसभा / विधानपरिषद ), विधान भवन, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे.
९. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. सर्व सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण.
१४. सर्व सह सचिव /उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती ( समन्वय ).